# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

---

जा.क्र./मऔविम/साप्रवि/पदभरती/पी५७४६४ दिनांक : ०४/०८/२०२३

## सुचना पत्र

सरळसेवा भरती २०१९ अंतर्गत मऔवि. महामंडळामार्फत गट-'क' आणि गट-'ड' मधील एकूण १४ संवर्गांमधील पदे भरण्यासाठी दिनांक १७/०७/२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर संवर्गामधील ५०२ पदे ही ऑनलाईन स्पर्धा परीक्षेव्दारे व ३६३ पदे ही ऑफलाईन स्पर्धा परीक्षेव्दारे भरावयाची होती. त्याअनुषंगाने ५०२ पदांकरीताची ऑनलाईन स्पर्धा परीक्षा दिनांक २०/०८/२०२१ ते २७/०८/२०२१ या कालावधीमध्ये घेण्यात येऊन सदर परीक्षेचा निकाल दिनांक १५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता. तथापी वाहनचालक, शिपाई, मदतनीस या संवर्गांसाठीची ऑफलाईन परीक्षा होऊ शकलेली नाही.

दिनांक २०/०८/२०२१ ते दिनांक २७/०८/२०२१ या कालावधी मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये लघुलेखक (निम्न श्रेणी) या संवर्गासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची प्रारुप निवड यादी दिनांक ३०/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर सदर पदासाठी आवश्यक असलेली व्यावसायीक परीक्षा होऊ न शकल्यामुळे व प्रारुप निवड यादी प्रसिध्द होऊन बराच कालावधी झालेला असल्यामुळे दिनांक १७/०७/२०१९ रोजी महामंडळाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील अट क्र. ३५ मधील तरतूदीनुसार सदर संवर्गासाठीच्या परीक्षेची प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

शिपाई, मदतनीस व वाहनचालक या संवर्गासाठीच्या ऑफलाईन परीक्षेसाठी मऔवि. महामंडळाने दिनांक १७/०७/२०१९ रोजीच्या जाहिरातीव्दारे महापरीक्षा पोर्टलमार्फत ऑनलाईन अर्ज मागविले होते. त्यानंतर शासन निर्णय क्र.मातंस-२०२०/प्र.क्र.११से-२/३९, दिनांक २० फेब्रुवारी, २०२० नुसार "शासनाच्या विविध विभागाच्या गट-क व गट-ड च्या पदभरती संदर्भात परीक्षा प्रक्रिया राबविण्याकरिता नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन सर्व्हीस प्रोव्हायडर (Service Provider) चे Empanelment करण्याची कार्यवाही महाआयटी मार्फत करण्यात येईल. त्यानुसार महाआयटीने Empanelment केलेल्या Vendor च्या यादीमधून OMR Vendor ची निवड करुन संबंधित विभागास परीक्षा आयोजित करता येईल" असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर आदेशानुसार पुढील कार्यवाही सुरु करण्यापुर्वीच कोव्हीड-१९ या महामारीच्या लॉकडाऊनमुळे सदर पदासाठीच्या ऑफलाईन परीक्षा घेण्यासाठी Vendor कंपनीची नेमणुक होऊ शकली नाही. त्यानंतर शासनाचा शासन निर्णय क्रमांक: मातंस-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दिनांक २१ जानेवारी, २०२१ नुसार शासनाने महापरिक्षा पोर्टल अंतर्गत घेण्यात येणा-या परीक्षा पध्दतीत आवश्यक बदल करुन पदभरतीची कार्यवाही शासनाने पॅनेलवर नियुक्त केलेल्या ४ कंपन्यांमार्फत करणे बंधनकारक केले होते.

त्याअनुषंगाने महामंडळाने माहे ०७/२०२१ मध्ये शासनाच्या पॅनलवरील कंपनी मे. ॲपटेक लिमिटेड यांची सदर स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी नेमणुक केली होती. सदर नेमणुक झाल्यानंतर लगेचच महामंडळाने माहे ०८/२०२१ मध्ये वर्ग-क पदांसाठीच्या ऑनलाईन परीक्षा घेण्यात येऊन त्या परीक्षेचा निकाल दिनांक १५/१२/२०२१ रोजी जाहीर करण्यात आला. त्यानंतर शिपाई, मदतनीस व वाहनचालक या संवर्गासाठीच्या ऑफलाईन परीक्षा घेणेचे वेळी शासनाने, शासन निर्णय क्र. मातंसं-२०२२/प्र.क्र.०१/से-२/३९, दिनांक १८ जानेवारी,२०२२ नुसार "राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक १५ जानेवारी, २०२२ च्या बैठकीत मा. मंत्रीमंडळाने पदभरतीसाठी घेण्यात येणा-या परीक्षेसाठी सध्या असलेल्या कंपन्यांचे पॅनल स्थगित करण्यात येत आहे, असा निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार यापुर्वी निर्गमित केलेले OMR Vendor च्या Empanelment बाबतचे शासन निर्णय क्र. मातंसं-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दि.२१/०१/२०२१ आणि शासन निर्णय क्रमांक मातंसं-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९, दि.०४/०३/२०२१ हे शासन निर्णय स्थगित करण्यात येत आहेत. यानंतर पदभरती संदर्भातील कोणतीही परीक्षा उक्त शासन निर्णयान्वये Empanelment केलेल्या OMR Vendor कडून घेण्यात येऊ नये" असे आदेश निर्गमित केले होते. त्यामुळे सदर शासन निर्णयानुसार महामंडळाने नेमणूक केलेल्या OMR Vendor कडून सदर पदांसाठीची ऑफलाईन परीक्षा घेता आलेली नाही. त्यानंतर शासनाचा शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ.पु.क्र., दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ नुसार शासनाने "ज्या विभाग/कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला नाही, अशा विभाग/कार्यालयांतील गट-अ, गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. सबब सदर शासन निर्णय व दिनांक १७/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील अट क्र. ३५ मधील तरतूदीनुसार शिपाई, मदतनीस व वाहनचालक या संवर्गांसाठीच्या परीक्षेची प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या अग्निशमन विभागाने सरळसेवा भरती २०१९ अंतर्गत चालक यंत्र चालक, अग्निशमन विमोचक, चालक (अग्निशमन), वीजतंत्री ग्रेड-२ (ऑटोमोबाईल) व मदतनीस (अग्निशमन) या ५ संवर्गाच्या पदभरतीसाठी दिनांक १५/१०/२०१९ रोजीच्या जाहिरातीव्दारे महापरीक्षा पोर्टल मार्फत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. तथापी शासन निर्णय क्र. मातंस-२०२०/प्र.क्र.११/से-२/३९३९, दिनांक २० फेब्रुवारी, २०२० नुसार महापरीक्षा पोर्टल मार्फत घेण्यात येणा-या परीक्षेचा शासन निर्णय क्र. मातंस-०८८/२७/२०१६-DIR IT(MH), दिनांक १९ सप्टेंबर,२०१७ हा शासन निर्णय अधिक्रमीत केलेला असल्यामुळे अग्निशमन विभागाच्या सदर भरती बाबतची पुढील प्रक्रिया होऊ शकली नाही. सदर पदासाठीची जाहिरात प्रसिध्द करुन बराच कालावधी झालेला असल्यामुळे सदर जाहिरातीतील अट क्र. ४३ मधील तरतूदीनुसार सदर संवर्गांसाठीच्या परीक्षेची प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

सदर सुचनापत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम. यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ